


**Mr. Sanjay Ghodawat (Chairman), Mr. Vinayak Bhosale (Trustee),**
**Mrs. Sasmita Mohanty (Principal) with the award for 3rd rank in Maharashtra for**
**Day cum Boarding CBSE Best Schools through Education World at Delhi.**

# महाराष्ट्रातील सर्वोत्तम शाळांमध्ये संजय घोडावत इंटरनॅशनल स्कूल

## 'एज्युकेशन वर्ल्ड' मासिकातर्फेही बहुमान

सकाळ वृत्तसेवा

जयसिंगपूर, ता. ३१ : अतिग्रे (ता. हातकणंगले) येथील संजय घोडावत इंटरनॅशनल स्कूल महाराष्ट्रातील तिसऱ्या क्रमांकाची शैक्षणिक संस्था म्हणून नावारूपास आली आहे. 'एज्युकेशन वर्ल्ड' मासिकाच्या सर्वेक्षणात स्कूलला हा बहुमान मिळाला. यामुळे स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

उद्योगपती संजय घोडावत यांनी अतिग्रे येथे तीन वर्षांपूर्वी या संस्थेची स्थापना केली आहे. दर्जेदार शिक्षण दिल्याने अल्पावधीत संस्थेने महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रात वेगळा ठसा निर्माण केला आहे. सीबीएसई अभ्यासक्रमाबरोबरच 'केंब्रीज इंटरनॅशनल' अभ्यासक्रम राबविणारी पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव शाळा आहे. या ठिकाणी पायाभूत सोयीसुविधा, शिक्षक-विद्यार्थी प्रमाण, शिक्षणाव्यतिरिक्त उपक्रम व त्यातील समतोलाच्या आधारावर 'एज्युकेशन वर्ल्ड' मासिकाने या संस्थेला हा दर्जा बहाल केला आहे.



संजय घोडावत

महाराष्ट्रातील सर्वोत्तम शाळांमध्ये संजय घोडावत इंटरनॅशनल स्कूलचा समावेश करताना शिक्षण पद्धती आणि विद्यार्थ्यांचा होणारा चौफेर विकास आदी बाबींचा निकष लावण्यात आला आहे.

तसेच दिल्या जाणाऱ्या भौतिक सुविधांचाही विचार केला गेला आहे. स्कूलमधील आनंदी वातावरणातील उत्कृष्ट शिक्षणाच्या जोरावर विद्यार्थ्यांच्या संख्येचा आलेखदेखील वाढता राहिला आहे. पंचवीस एकर क्षेत्रात सुरू केलेल्या या प्रशस्त जागेत किंडरगार्डन, प्रायमरी व हायस्कूलच्या प्रशस्त इमारती उभारण्यात आल्या आहेत.